# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# बी. डी. कॉलेजमधील विविध कोर्सेसला शासनाची मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** येथील कोयना एज्युकेशन सोसायटी पाटणच्या बी.डी. कॉलेजमध्ये बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स एटायर, एम. कॉम आय.टी आणि एम.ए. इतिहास या नवीन अभ्यासक्रमांना चालू शैक्षणिक वर्षापासून शासनाची मान्यता मिळाली आहे. व्यावसायिक शिक्षण ही आज काळाची गरज बनत चालली आहे. त्यादृष्टीने ग्रामीण भागातील मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्याना आयटी क्षेत्रात करिअर करण्याची संधी उपलब्ध झाल्याची माहिती महाविद्यालय प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांनी दिली.

प्राचार्य डॉ. एस.डी. पवार म्हणाले, 'पाटण तालुका हा दुर्गम व डोंगराळदऱ्या खोऱ्यात विखुरलेला आहे. आज ही अनेक वाड्या दुर्गम डोंगराळ भागात वसलेली आहेत. येथील मुलांना मुंबई, पुणे, कोल्हापूर सारखे शिक्षण मिळाले पाहिजे. आता संगणकीय शिक्षण ही काळाची गरज आहे.

पाटणमध्ये आयटी शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी यासाठी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी शासन दरबारी विशेष प्रयत्न केले. हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठ यांच्याकडे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हाण यांनी सातत्याने पाठपुरवा केला. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षापासून कॉलेजमध्ये अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांनी केले. (वा.प्र.)